# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02 / 11 / 2022 (बुधवार)

## चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०५ कि. मी. सुकळी बेलदार एमआयडीसी बोरी येथे दिनांक २७/१०/२०२२ चे १२.०० वा. ते दिनांक ३१/१०/२०२२ चे सुमारास फिर्यादी नामे– रामचंद्र सुदामजी अंबूले वय ३७ वर्षे रा. सुकळी बेलदार हे घराला व दूकानाला ताला लावून गावाला गेले होते होते. दि. ३१/१०/२०२२ चे सायंकाळी १८.०० वा घरी आले तेव्हा त्यांना बाहेरचे लोखंडी गेटचे कुलूप तूटलेले दिसले. कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचा व दुकानाचा ताला तोडून चोरून नेल्याने त्यानंतर घरात जावून बघितले असता मुख्य गेटचे ही कुलूप तूटलेले दिसले. आतमध्ये जावून बघितले तर आलमारी उघडी व तुटलेली असून घरातील कपडे अस्तव्यस्त पडलेले त्यांना दिसले. कपडयामध्ये ठेवलेले नगदी १०,०००/–रु, मुलीच्या पिगीबॅक चा डब्बा ज्यात अंदाजे ५०००/– रु जमा, व देवाजवळील चिल्लर पैसे २०००/–रु असा एकुण अंदाजे १७,०००/–रुपयाचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन एमआयडीसी बोरी करीत आहे.

## अपघातात मृत्यू

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत काटोल ते पारडसिंगा रोड बासेवार कॉम्प्लेक्स जवळ काटोल येथे दिनांक ०१/११/२०२२ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. ज्योती दिपक भोग वय ३५ वर्ष रा. जयस्वाल कॉलनी सावनेर ता. सावनेर हे आपले पती नामे–श्री. दिपक भोग व मुलगी नामे– कु. हिमांशी हिचे सह मोपेड गाडी क्र.एम.एच.३१,एफ.के.४४७९ ने नागपुर वरुन पारडसिंगा येथे जात असता काटोल येथील बासेवार कॉम्प्लेक्स जवळ अल्टो कारनी कट मारल्यानी फिर्यादी व पती व मुलगी हे रोडचे खाली पडले तेव्हा मागुन एम.एच.२४/सि.४९३१ च्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून मागुन धडक दिल्याने फिर्यादीचा पति दिपक भोग यांना पायाला मार लागुन जख्मी झाले. मुलगी कु. हिमांशी हिचे डोक्याला जबर मार लागल्याने हिचे मरणास एम.एच.२४/सि.४९३१ चा चालक कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९ ३३७ ३३८ ३०४ अ भादवी सह कलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन काटोल करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**